# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/11/2022 (सोमवार) दुपार

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा भदी पिपळा बस स्टॉप जवळ दिनांक २६/११/२०२२ चे १८.३० वा. ते १८.४५ वा. दरम्यान यातील मृतक नामे– मनिष मोतीराम काळे, वय ४० वर्ष, रा. काकडे लेआउट सावनेर ता. सावनेर हा भदी पिपळा बस स्टॉप समोर रोड ओलांडत असताना सावनेर कडुन पांढुर्णा कडे जाणारी हिरो एच. एफ. डिलक्स गाडी क्र. मोटरसायकल क्र. एम ४०/बी. झेड.–४१८० चालक आरोपी नामे–आशिष राजु गोडबोले, वय २० वर्ष, रा. हिंगणा बडेगाव, ता. सावनेर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायदळ जाणारा वरील इसमास धडक मारुन गंभीर जखमी केले. उपचारा दरम्यान नमुद जखमी मरण पावला व आरोपी मोटरसायकल चालक हा जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धनराज मोतीराम काळे, वय ४५ वर्ष, रा. काकडे लेआउट सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (ए) भादवी, सहकलम १८४, १८५ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी मोटरसायल चालक हा जखमी असल्याने शासकीय रूग्णालय, सावनेर येथे उपचार सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. पवार ब. नं ७७१ मो. नं . ७८७५९८३३६० हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील एम. आय. डी. सी. उमरेड येथे दिनांक २७/११/२०२२ चे १८.०० वा. ते दिनांक २८/११/२०२२ चे ते १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– दिनकर गुलाबराव डेंगे, वय ५८ वर्ष, रा. अडयाळी पोस्ट. कळमना ता. नागपुर हा शासकीय दुध शीतकरण केंद्र एमआयडीसी उमरेड येथे देखरेख व साफसफाई चे काम करतो. नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा नेहमीप्रमाणे सकाळी १०.०० वा. डयुटीवर गेला व कंपाऊंडचा ताला खोलुन आत प्रवेश करून यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने मुख्य शितकरण केंद्राच्या गृहाचा दरवाज्याचा ताला तोडुन आत प्रवेश करून १) कॉम्प्रेसर मशीन किमती अंदाजे ३५,०००/– रू. २) कॉम्प्रेसर सिलेंडर किमती ४००० रू. ३) दुधाच्या कॅनचे अॅल्मुयनियमचे झाकण २२ नग किमती २०००० रू. ४) स्टीलचे लांब पाईप २ नग किंमती ४००० असा एकुण ६३०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, मो. नं. **9763707184** हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**